लोकमत

## अनिल काकोडकर : 'शिवाजी द ग्रेट' चरित्रग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे कोल्हापुरात प्रकाशन

# सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे जाणून घेण्यासाठी विद्यापीठांत संशोधन व्हावे

लोकमत न्यूज नेटवर्क


**कोल्हापूर :** देशाची सामाजिक, राजकीय वाटचाल भविष्यात कोणत्या मार्गाने होईल, त्याबाबतची आवश्यक स्थित्यंतरे जाणून घेण्याबाबतची चर्चा आणि संशोधन विद्यापीठांमध्ये व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी शुक्रवारी येथे केले.

महान शिवचरित्रकार प्राचार्य डॉ. बाळकृष्ण लिखित आणि शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या चरित्रग्रंथाच्या नव्या आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषाभवनमधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर शाहू छत्रपती प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, आजची सामाजिक परिस्थिती, लोकतंत्र, राजकीय स्थितीची कारणमीमांसा लावण्यासाठी काही संशोधन झाले असेल. मात्र, देशाची भविष्यातील सामाजिक, राजकीय, आदी क्षेत्रांची वाटचाल कशी राहील व प्रगतीबाबतचे योग्य आडाखे बांधणे, तर्क लावणे दिशादर्शक ठरणार आहे. त्या दृष्टीने संशोधनाला विद्यापीठांत चालना मिळावी.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, हा ग्रंथ कोल्हापूरच्या महान परंपरेचा वारसा आहे. शिवचरित्र हाच आजच्या स्थितीतील धर्मग्रंथ आहे. विद्यार्थ्यांनी या ग्रंथाचे वाचन करावे. संशोधकांनी संकुचित विचार सोडून कार्यरत राहावे.

दीपक जाधव




शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ अनिल काकोडकर आणि शाहू छत्रपती यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून जयसिंगराव पवार, देवानंद शिंदे, डी. टी. शिर्के, व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

## ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ काकोडकर म्हणाले...

- प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांनी अथक संशोधन, परिश्रमातून 'शिवाजी द ग्रेट' हा महाग्रंथ साकारला.
- ग्रंथात परिपूर्ण, अभ्यासलेली माहिती असल्याने या ग्रंथाचे मोल मोठे आहे.
- हे शिवचरित्र इतिहास संशोधक, शिवप्रेमींच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.
- इतिहास हा माझा शाळेतील नावडता विषय होता; पण अणुशक्तीच्या प्रकल्पावर काम करताना या विषयात आवड निर्माण झाली.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. पवार यांनी प्रास्ताविक केले. शिवाजी विद्यापीठाचे स्वप्न साकारणाऱ्या डॉ. बाळकृष्ण यांचे स्मरण जपण्याच्या उद्देशाने विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये 'शिवाजी द ग्रेट' ग्रंथाच्या नव्या आवृत्तीचे काम सुरु केले. डॉ. बाळकृष्ण यांनी साकारलेले हे शिवचरित्र डच, पोर्तुगीज, इंग्लिश, फ्रेंच या भाषांमधील कागदपत्रांवर आधारित आहे. त्यांनी चार खंडांतील ग्रंथाच्या माध्यमातून शिवचरित्र जागतिक पातळीवर नेले. इतिहासाकडे सामाजिक इतिहास म्हणून पाहणे आवश्यक असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. राजन गवस, मेघा पानसरे, मंजूश्री पवार, रणधीर शिंदे, आदी उपस्थित होते. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आभार मानले.

### विचार रुजविण्याची गरज

या कार्यक्रमात शाहू छत्रपती म्हणाले, 'शिवाजी द ग्रेट' हा ग्रंथ छत्रपतींबाबतचा इंग्रजी भाषेतील पहिला ग्रंथ आहे. त्यांचे कार्य जागतिक पातळीवरील घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा ग्रंथ उपयोगी ठरणारा आहे. आजकाल छत्रपतींचे नाव घेऊन सर्व गोष्टी केल्या जातात. मात्र, त्यांचे विचार रुजविण्याची खरी गरज आहे.

- शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार हे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांचे शिष्य. डॉ. पवार यांचा मी शिष्य आहे. त्यामुळे या ग्रंथाच्या नव्या आवृत्तीच्या प्रकाशनाला एक वेगळे महत्त्व असल्याचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी सांगितले.

# ‘संशोधनाला चालना मिळावी’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर




डॉ. बाळकृष्ण लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करताना (डावीकडून) डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अनिल काकोडकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

'प्रगतीच्या तंत्राचे योग्य आडाखे बांधण्याची प्रक्रिया भविष्यात दिशादर्शक ठरणार आहे. सामाजिकदृष्ट्या आवश्यक असलेली स्थित्यंतरे जाणून त्यासाठीच्या परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या संशोधनाला चालना मिळायला हवी,' असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.

ज्येष्ठ इतिहासकार डॉ. बाळकृष्ण लिखित आणि डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या चौ-खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भाषा भवन सभागृहात शुक्रवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, 'वर्तमान परिस्थितीमधील भारताच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा घेणे ही आता संशोधनाच्या माध्यमातून गरज निर्माण झाली आहे. देशाच्या सामाजिक परिस्थितीत कशाप्रकारे स्थित्यंतरे झाली? त्यामधून सामाजिक परिस्थिती कशी मार्गक्रमण झाली? यामध्ये भविष्यात कसा बदल होणे अपेक्षित आहे. याविषयी संशोधनाच्या पातळीवर सखोल चिंतन व चर्चात्मक अभ्यास होण्याची गरज आहे. स्थित्यंतराकडे अशाप्रकारच्या सापेक्षतेने पाहणाऱ्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यामध्ये 'शिवाजी द ग्रेट'यासारखा ग्रंथ मोलाचे योगदान देणारा आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवरायांच्या कार्याचा साद्यंत वेध घेतलेला आहे.'

## 'शिवाजी द ग्रेट'चे प्रकाशन

श्रीमंत छत्रपती शाहू महाराज म्हणाले, 'छत्रपती शिवरायांचे नाव घेण्यासोबत त्यांनी दिलेला विचारही अंगिकारण्याची गरज आहे. शिवाजी महाराजांचे कार्य जनतेपर्यंत पोहोचावे यासाठी हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल.' कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'डॉ. पवार यांनी या वयातही ज्या उत्साहाने आणि जोमाने आपले संशोधनाचे कार्य अखंडितपणे चालविले आहे ही अनुकरणीय गोष्ट आहे. समाजशास्त्रात संशोधन कदाचित सीमित राहू शकते हा समज खोडून काढणारे संशोधन इतिहासासारख्या विषयात करण्याचा आदर्श डॉ. पवार यांनी ठेवला आहे.'

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'डॉ. बाळकृष्णांनी मृत्युशय्येवर असतानाही शिवचरित्राचा ध्यास घेऊन ते कसे पूर्ण केले. 'शिवाजी द ग्रेट'च्या माध्यमातून शिवरायांना वैश्विक स्तरावर नेण्याची कामगिरी डॉ. बाळकृष्ण यांनी केली आहे.' यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'शिवाजी द ग्रेट' महाग्रंथाचे प्रकाशन झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुण्यनगरी
20 OCT 2018

# स्थित्यंतरांचा वेध घेणाऱ्या संशोधनाला चालना आवश्यक

## डॉ. अनिल काकोडकर : 'शिवाजी द ग्रेट' या चौ-खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

वर्तमान परिस्थितीमधील भारताच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा घेऊन भविष्याचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला विद्यापीठांनी चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी शुक्रवारी केले.

थोर इतिहासकार डॉ. बाळकृष्ण लिखित आणि डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या चौ-खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाले, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवरायांच्या कार्याचा साद्यंत वेध घेतलेला आहे.



कोल्हापूर : डॉ. बाळकृष्ण लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करताना डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अनिल काकोडकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. (छाया : एस. अली)

हा महाग्रंथ शिवरायांच्या समकालीन परकीय वस्तुनिष्ठ संदर्भांच्या आधारे त्यांनी साकारलेला आहे. त्यामुळे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सद्यःस्थितीतील राजकीय, सामाजिक उत्क्रांतीच्या कारणांचा शोध व वेध घेण्यासाठी अशा ऐतिहासिक दस्तऐवजांचे योगदान मोलाचे आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी अथक संशोधनांती अत्यंत परिश्रमातून हा महाग्रंथ साकारला आहे. इतके मोठे शिवचरित्र मी प्रथमच पाहतो आहे. इतिहास संशोधकांसह सर्वसामान्य शिवप्रेमींच्या दृष्टीनेही या ग्रंथाचे मोल मोठे आहे.

श्रीमंत छत्रपती शाहू महाराज म्हणाले, छत्रपती शिवरायांचे आपण सारे नाव घेतो; मात्र त्यांचा विचार घेत नाही. या देशातील जनतेने या न्यायप्रिय राजाच्या चरित्रापासून दिशादर्शक प्रेरणा घेण्याची गरज आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. पवार यांनी या वयातही ज्या उत्साहाने आणि जोमाने आपले संशोधनाचे कार्य अखंडितपणे चालवले आहे, त्याचा मला प्रचंड विस्मय वाटतो. सामाजिक विज्ञानामध्ये संशोधनाला मर्यादा आहेत, असे म्हणणारा आणि मानणारा एक मोठा संशोधकवर्ग ▸▸ पान ५ वर

# स्थित्यंतरांचा वेध घेणाऱ्या संशोधनाला चालना आवश्यक

(पान १ वरून) आपल्याकडे आहे. संशोधकाने सर्वप्रथम आपला हा संकुचितपणा सोडून देऊन व्यापक दृष्टीने भूतकाळाकडे, वर्तमानाकडे पाहायला हवे आणि त्यातून त्याने भविष्याचा वेध घ्यायला हवा. सामाजिक संशोधनाच्या या निकषांमध्ये अत्यंत समर्पित भावनेने डॉ. पवार यांनी कार्य चालवल्यानेच त्यांचे संशोधन अनमोल आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी लिहिलेल्या शिवचरित्राचे पुनरुज्जीवन करून या महाराष्ट्रावर त्यांनी मोठे उपकार केले आहेत. शिवाजी महाराज यांचे चरित्र म्हणजे सामान्यत्वापासून असामान्यत्वाकडील प्रवासाचे ज्वलंत उदाहरण आहे. युगानुयुगे त्यांचे चरित्र प्रेरणा देत राहील.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी आपल्या प्रास्ताविकात डॉ. बाळकृष्ण यांनी मृत्युशय्येवर असतानाही शिवचरित्राचा ध्यास घेऊन ते कसे पूर्ण केले, याचे मर्मग्राही विवेचन केले. शिवाजी विद्यापीठाची स्थापना हे डॉ. बाळकृष्ण आणि छत्रपती राजाराम महाराज यांचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. हा इतिहास तरुण पिढीने लक्षात घेण्याचे आवाहन त्यांनी केले. 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथाच्या माध्यमातून शिवरायांना वैश्विक स्तरावर नेण्याची कामगिरी डॉ. बाळकृष्ण यांनी केली, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

सकाळ

# साक्षेपी संशोधनाला चालना देणे आवश्यक

## डॉ. अनिल काकोडकर; 'शिवाजी द ग्रेट' ग्रंथाच्या आवृत्तीचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १९ : भविष्याचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला विद्यापीठाने चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी आज येथे केले. वर्तमान स्थितीत भारताच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा संशोधनात्मकदृष्टीने घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. बाळकृष्ण लिखित व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या चौ-खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते प्रकाशन झाले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. काकोडकर म्हणाले, ''डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वेध घेतला आहे. हा महाग्रंथ शिवरायांच्या समकालीन परकीय वस्तुनिष्ठ संदर्भांच्या आधारे त्यांनी साकारलेला आहे. त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सद्यःस्थितीचे राजकीय, सामाजिक उत्क्रांतीच्या कारणांचा शोध व वेध घेण्यासाठी अशा ऐतिहासिक दस्तावेजांचे योगदान मोलाचे आहे. इतके मोठे शिवचरित्र मी प्रथमच पाहतो आहे.''

शाहू महाराज म्हणाले, ''छत्रपती शिवरायांचे आपण सारे नाव घेतो. मात्र, त्यांचा विचार घेत नाही. देशातील जनतेने या न्यायप्रिय राजाच्या चरित्रापासून दिशादर्शक प्रेरणा घेण्याची गरज आहे.''

डॉ. शिंदे म्हणाले, ''डॉ. पवार यांनी या वयातही ज्या उत्साहाने आणि जोमाने आपले संशोधनाचे कार्य अखंडितपणे चालविले आहे, त्याचा मला प्रचंड विस्मय वाटतो.''

डॉ. पवार यांनी डॉ. बाळकृष्णांनी मृत्युशय्येवर असतानाही शिवचरित्राचा ध्यास घेऊन ते कसे पूर्ण केले, याचे मर्मग्राही विवेचन केले.'' प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन प्रसंगी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर. शेजारी डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पदव्युत्तर संस्था,
संत तुकारामनगर, पिंपरी – ४११ ०१८
जाहिरात क्रमांक : ३०१ / २०१८
WALK IN INTERVIEW (विशेष भरती मोहिम)
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील अस्थायी आस्थापनेवर दरमहा

20 OCT 2018
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# स्थित्यंतरांचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला चालना गरजेची

## डॉ. अनिल काकोडकर; 'शिवाजी द ग्रेट' महाग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वर्तमान परिस्थितीमधील भारताच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा घेऊन भविष्याचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला विद्यापीठांनी चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी शुक्रवारी येथे केले.

इतिहासकार डॉ. बाळकृष्ण लिखित आणि डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.




**कोल्हापूर : डॉ. बाळकृष्ण लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करताना डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अनिल काकोडकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शाहू छत्रपती, डॉ. डी, टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर.**

शाहू छत्रपती, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा साद्यंत वेध घेतलेला आहे. हा महाग्रंथ शिवरायांच्या समकालीन परकीय वस्तुनिष्ठ संदर्भांच्या आधारे त्यांनी साकारलेला आहे. त्यामुळे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

यावेळी शाहू छत्रपती म्हणाले, छत्रपती शिवरायांचे आपण सारे नाव घेतो; मात्र त्यांचा विचार घेत नाही. या देशातील जनतेने या न्यायप्रिय राजाच्या चरित्रापासून दिशादर्शक प्रेरणा घेण्याची गरज आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी महाराज यांचे चरित्र म्हणजे सामान्यत्वापासून असामान्यत्वाकडील प्रवासाचे ज्वलंत उदाहरण आहे. युगानुयुगे त्यांचे चरित्र प्रेरणा देत राहील. डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे प्रस्तावित राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत बोलताना दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. यावेळी डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. नागनाथ कोतापल्ले, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी महाराजांच्या नावे प्रस्तावित पुरस्कार समितीची बैठकीत चर्चा

## राष्ट्रीय निवड समितीची पहिली बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीची पहिली बैठक विद्यापीठात शुक्रवारी झाली. या बैठकीत पुरस्काराचे स्वरूप व इतर अनुषंगिक नियोजनाबाबत समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, ज्येष्ठसाहित्यिक डॉ. नागनाथ कोतापल्ले, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी यावेळी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

बैठकीच्या सुरुवातीस कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पुरस्कारासंदर्भात भूमिका मांडली. ते म्हणाले, शिवाजी महाराज यांच्या नावाने हे विद्यापीठ स्थापन झालेले आहे. छत्रपतींचे विचार व कार्य यांचा सर्वदूर प्रसार करण्यासह त्यांच्या नावे पुरस्कार देऊन महाराजांच्या स्मृतींना चिरंतन अभिवादन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

यावेळी मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, हा पुरस्कार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने दिला जाणार आहे. त्यामुळे तो अत्यंत प्रतिष्ठेचा असेल. त्यामुळे या पुरस्काराचा लौकिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर राखण्यासाठी नियोजन करणे अपेक्षित आहे. ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, पुरस्कार देणाऱ्या व्यक्तीचे कार्य संविधानिक असावे. या मुद्द्यावर डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. जयसिंगराव पवार आदींनीही मते मांडली.

यावेळी पुरस्काराच्या स्वरूपाबाबत प्राथमिक चर्चा झाली. जानेवारी २०१९ मध्ये प्रस्तावित पुढील बैठकीत याबाबत अधिक तपशीलवार चर्चा करण्यात येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याकडून देण्यात आली.

20 OCT 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावित पुरस्कार समितीची विद्यापीठात बैठक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीची पहिली बैठक शुक्रवारी सकाळी समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पुरस्कार प्रस्तावित करण्यामागील आपली भूमिका विर्शद केली. ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने हे विद्यापीठ स्थापन झालेले आहे. छत्रपतींचे विचार व कार्य यांचा सर्वदूर प्रसार करण्यासह त्यांच्या नावे पुरस्कार देऊन महाराजांच्या स्मृतींना चिरंतन अभिवादन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

या बैठकीत पुरस्कार गठित करण्याच्या अनुषंगाने प्राथमिक चर्चा करण्यात आली. जानेवारी २०१९ मध्ये प्रस्तावित पुढील बैठकीत अधिक तपशीलवार चर्चा करण्यात



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या पहिल्या बैठकीप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासमवेत मान्यवर.**

येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

यावेळी समितीचे सदस्य ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, 'डिक्की'चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मिलिंद कांबळे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
तरुण भारत

# शिवाजी महाराजांच्या नावे विद्यापीठातर्फे पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीची पहिली बैठक शुक्रवारी झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

बैठकीत पुरस्कार गठित करण्याच्या अनुषंगाने प्राथमिक चर्चा झाली. जानेवारीत पुढील बैठक आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. यावेळी समितीचे सदस्य ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, 'डिक्की''चे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मिलींद कांबळे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार उपस्थित होते.

20 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव २६ पासून

## साताऱ्यात प्रारंभ : २७ ऑक्टोंबरला कोल्हापुरात रंगणार महोत्सवाची धमाल

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिवाळीनंतर शिवाजी विद्यापीठाने नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे. यामुळे यंदाच्या युवा महोत्सवाचा मार्ग मोकळा झाला असून ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाची सुरूवात सातारा येथून शुक्रवार (२६ ऑक्टोबर) पासून होणार आहे. तर कोल्हापूर जिल्ह्यातील महोत्सव शनिवार (२७ ऑक्टोंबर) रोजी महावीर महाविद्यालय येथे होणार आहे. सांगलीमध्ये ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान महोत्सव रंगणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या युवा महोत्सवाचे नियोजन सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात केले होते. मात्र प्राध्यापकांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू झाले. यामुळे महाविद्यालयांना महोत्सव घेणे शक्य नसल्याचे विद्यापीठाला कळविले.



यानंतर विद्यापीठाने महोत्सव पुढे ढकलला होता. गत दोन दिवसांपूर्वी विद्यापीठाने पहिल्या सत्रातील परीक्षांच्या वेळापत्रकात बदल केला. त्यामुळे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाने महोत्सवाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होईल. त्यातील विविध स्पर्धांमधील पहिल्या तीन क्रमांकांचे विजेते मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होणार आहेत.

### साताऱ्यातून महोत्सवाला सुरूवात

युवा महोत्सवाची सुरुवात कोरेगाव (सातारा) येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात शुक्रवार (२६ ऑक्टोबर) होणार आहे. तर शनिवार (२७ ऑक्टोबर) रोजी कोल्हापुरात महावीर महाविद्यालयात महोत्सव रंगणार आहे. तर सांगली जिल्ह्याचा महोत्सव रविवार (२९ ऑक्टोबर) रोजी आटपाडीतील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात होणार आहे.

मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान रंगणार आहे. या वर्षीचा राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य" महोत्सव डिसेंबरमध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाची संघ निवड चाचणी ३ आणि ४ नोव्हेंबरला विद्यापीठात होणार आहे.

### या कलाप्रकारात रंगणार युवा महोत्सव

एकांकिका, लोकनृत्य, लोककला वाद्यवृंद, लघुनाटिका, पथनाट्य, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, मूकनाट्य, वादविवाद या स्पर्धा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात होतील. या स्पर्धांसह शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, भितिचित्र, कोलाज, मातीकाम, रांगोळी, स्थळचित्रण, छायाचित्रण, शास्त्रीय गायन, सुगम गायन, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य समूहगीत, भारतीय समूहगीत, नकला, एकपात्री, शास्त्रीय सूरवाद्य, तालवाद्य या स्पर्धा मध्यवर्ती महोत्सवामध्ये होणार आहे. जिल्हा पातळीवरील महोत्सवात विविध कलाप्रकारांतील १४ आणि मध्यवर्तीमध्ये ३२ स्पर्धा होतात. यावर्षी 'मेहंदी" या कलाप्रकाराची स्पर्धा समाविष्ट केली आहे. महोत्सवाची तयारी सुरू असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव २६ पासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव २६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे, तर यंदाचा ३८ वा मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीमध्ये ३१ ऑक्टोबर रोजी सुरू होणार आहे. युवा महोत्सवाच्या नवीन वेळापत्रकानुसार २६ रोजी सातारा जिल्ह्याचा युवा महोत्सव कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात, कोल्हापूर जिल्ह्यातील महोत्सव २७ ऑक्टोबरला महावीर महाविद्यालयात, तर सांगली जिल्ह्याचा महोत्सव २९ ऑक्टोबरला आटपाडीतील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात होणार आहे. मध्यवर्ती युवा महोत्सव सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयात ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान रंगणार आहे. या वर्षीचा राज्यस्तरीय 'इंद्रधनुष्य' महोत्सव डिसेंबरमध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाची संघ निवड चाचणी ३ आणि ४ नोव्हेंबरला विद्यापीठात होणार आहे.

# विद्यापीठात दिवाळी अंकाचे प्रदर्शन

कोल्हापूर टाइम्स टीम



शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातील दुर्मिळ दिवाळी अंक प्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी भेट दिली

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातील दुर्मिळ दिवाळी अंकांचा संग्रह प्रदर्शनाच्या माध्यमातून खुला करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त या संग्रहाचे प्रदर्शन भरवण्यात आले. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा सर्वत्र वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला.

यानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामार्फत सन १९३२ पासून प्रकाशित झालेल्या दुर्मिळ दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत उपस्थित होते.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त ज्ञानस्रोत केंद्राच्या संगणकीय वाचक प्रवेश नोंद प्रणालीचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. शालिनी लिहितकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
Times of India

# SUK figures in 56-60 band in QS India university rankings

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has figured in 56-60 band in the recently announced QS India rankings.

According to the university statement 'QS World University Ranking' conducts separate BRICS (Brazil, Russia, India, China and South Africa) ranking as well.

Under Indian institutions, the SUK has scored 56-60 band rank, while under BRICS ranking it has scored 251-260 rank. Notably, the university had not made it to the top 100 in the NIRF rankings earlier this year.

The statement added that the ranking is based on factors such as academic reputation, teacher-student ratio, number of teachers with PhD, research articles, number of international students, number of international teachers etc.

According to the university, under the research factor, the varsity stands second among elite institutes, the first one is Mumbai-based Institute of Chemical Technology. The officials said that the certificate distribution of the ranking was organised earlier last week at New Delhi.

Devanand Shinde, vice-chancellor of SUK said that the cognizance from the international level organisation is a confidence booster for the institution.

"The SUK teachers have frequently fared better in their research across the world and it has always reflected in the all the rankings which we have gone through. It is inspiring for all of us and we will strive hard for achieving better research," he said.

It has to be noted that the Indian Institute of Technology, Bombay has topped the first standalone QS rankings for Indian institutions, followed by IIT Madras and the Indian Institute of Science (IISc), Bengaluru. Seven IITs were ranked in the top 10 and also the University of Hyderabad and Delhi University. Mumbai University, ranked 14, is the top public university in Maharashtra.

In the QS list, 75 top Indian institutions have been named. IISc was adjudged India's best institution in the QS World University Rankings released earlier this year. But the domestic league has seen IIT-Bombay getting top rank.

On the difference in rankings of Indian institutions in the domestic and international tables, the QS (Quacquarelli Symonds) organisation explained that the performance criteria for Indian university rankings were the same as for QS BRICS rankings.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
Times of India

# Observe vigilance awareness week from Oct 29: UGC

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked the universities and colleges in the region to participate in the vigilance awareness week that will start from October 29.

Various activities have also been asked to be conducted during the week. UGC secretary Rajnish Jain, via an October 16 circular, said, "As you are aware that the Central Vigilance Commission (CVC), the apex integrity institution of the country, observes Vigilance awareness week every year and also advises all ministries/departments/public sector banks/insurance companies/autonomous organisations/societies to observe the same. This year, the CVC has decided to observe the Vigilance Awareness Week from October 29 to November 3."

The UGC has also asked the varsities and its affiliated college to send a report on the vigilance awareness week by November 10. The CVC, in its letter to the UGC, has suggested host of activities for the academic institutions such as taking integrity pledge, conducting workshops and sensitization programmes, conducting various competitions such as debate, and quiz, bringing out special issue of journals/newsletters on vigilance issues, systemic improvements and good practices adopted for wider dissemination and awareness.

It added that activities conducted in schools and colleges need to be sustained over a period of time to ensure that ethical values are ingrained permanently in the minds of the younger generation. All organisations may therefore encourage establishment of 'Integrity clubs' in schools and colleges a younger generation is the future assets of the country and it is important to cultivate moral values in them.

"Observance of vigilance awareness week every year is part of the multi-pronged approach of the commission where a key strategy is to encourage all stakeholders to collectively participate in the prevention of and the fight against corruption," the letter read.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांचा आज स्नेहमेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन शनिवार, दि. २० रोजी करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे तसेच विद्यापीठाशी असलेला स्नेह वृद्धिंगत करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ

माजी विद्यार्थ्यांशी असलेले नाते घट्ट व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे विशेष प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी अनेक माजी विद्यार्थीही प्रयत्नशील असून विविध उपक्रम सध्या घेतले जात आहेत. मेळावा दि. २० रोजी शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी ११.३० वाजता होणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन समन्वयक डॉ. जी. एस. राशिनकर यांनी केले आहे. या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाशी कायमचे दृढ नाते राहावे, यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्न केले जाणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

लोकमत



इचलकरंजीत शिक्षक गौरव पुरस्काराचे वितरण शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सत्कारमूर्ती व संयोजक उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाने ज्ञानामधील विषमता दूर

## देवानंद शिंदे : रोटरी सेवा केंद्रात शिक्षक गौरव पुरस्कारांचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** आजच्या युगात तंत्रज्ञान खूप बदलले आहे. तंत्रज्ञानाने जगात एकप्रकारे रक्तहीन क्रांती केली आहे. तंत्रज्ञानाने ज्ञानामधील विषमता दूर केली आहे, त्याचा फायदा आपण घ्यायला हवा. असे असले तरी तंत्रज्ञान हे साधन आहे आणि साधन गुणवत्ता देऊ शकत नाही. गुणवत्ता ही शिक्षक देऊ शकतात आणि त्यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ता व संस्कार द्यायला हवेत, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

येथील रोटरी क्लब, रोटरी सेंट्रल, टेक्स्टाईल सिटी, हेरिटेज आणि इनरव्हील क्लब या संस्थांच्यावतीने रोटरी सेवा केंद्रात आयोजित शिक्षक गौरव पुरस्कार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. तत्पूर्वी प्रज्ञा योगेश करंदीकर (शरद इंग्लिश मीडियम स्कूल), संतोष राजाराम चव्हाण (एन. डी. मगदूम प्राथमिक विद्यामंदिर), भारती विकास कासार (डीकेटीई इंग्लिश मीडियम हायस्कूल), डॉ. सुभाष इंगळे (डीकेएएससी महाविद्यालय) आणि शिवाजी कुंभार (अण्णासाहेब राजमाने विद्यालय, रुई) या शिक्षकांचा सत्कार डॉ. शिंदे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व पुष्पहार देऊन करण्यात आला.

मुकेश जैन यांनी स्वागत केले. अमर डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. निवेदन धांदनिया यांनी फोर वे टेस्टचे वाचन केले. यावेळी शिक्षक व रोटरी परिवारातील सदस्य उपस्थित होते. कौस्तुभ दातार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2018
तरुण भारत




कोल्हापूर : पासपोर्ट नोंदणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी केआयटीचे उपाध्यक्ष सुनिल कुलकर्णी, संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी, जीवन शिंदे, विनायक पाचलग, रोट्रॅक्ट क्लब ऑफ केआयटी सनशाईनचे समन्वयक डॉ. संदीप देसाई, सनत चेन्दवणकर.

# केआयटीमध्ये पासपोर्ट नोंदणी शिबिराचे उद्घाटन

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजीचे अभियांत्रिकी महाविद्यालय आणि परराष्ट्र मंत्रालय, भारत सरकार व विभागीय पासपोर्ट कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''फास्टपोर्ट-फॅकल्टी, स्टुडंन्टस्, स्टाफ विथ पासपोर्ट' या उपक्रमांतर्गत केआयटी मध्ये चार दिवसीय पासपोर्ट नोंदणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स च्या माध्यमातुन उपस्थितांना पासपोर्ट नोंदणी चे महत्व सांगत, या शिबिराच्या आयोजनासाठी आयोजकांचे व केआयटीचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. शिबिरास एकुण १६७४ हुन अधिक विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग दर्शविला असून त्यांच्यो पासपोर्ट नोंदणी चे काम सुरु आहे. या शिबिराच्या आयोजनासाठी पुणे येथील आयपीएस, विभागीय पासपोर्ट कार्यालयाचे अनंत ताकवले, प्रोटोकॉल इनचार्ज, विभागीय पासपोर्ट कार्यालयाचे जतीन पोटे, केआयटीचे अध्यक्ष भरत पाटील, उपाध्यक्ष सुनिल कुलकर्णी, सचिव दिपक चौगुले, संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी व रजिस्ट्रार डॉ. एम. एम. मुजुमदार यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराचे आयोजन डॉ. अक्षय थोरवत व रोट्रॅक्ट क्लब ऑफ केआयटी सनशाईनचे समन्वयक डॉ. संदीप देसाई, विद्यार्थी अध्यक्ष सनत चेन्दवणकर व इतर विद्यार्थ्यांनी केले.

**१ हजार ६७४ विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला**


पुढारी

# स्थित्यंतरांचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला चालना गरजेची

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वर्तमान परिस्थितीमधील भारताच्या सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांचा शास्त्रीयदृष्ट्या आढावा घेऊन भविष्याचा साक्षेपी वेध घेणाऱ्या संशोधनाला विद्यापीठांनी चालना देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी शुक्रवारी येथे केले.

इतिहासकार डॉ. बाळकृष्ण लिखित आणि डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या खंडात्मक शिवचरित्राच्या नूतन आवृत्तीचे प्रकाशन डॉ. काकोडकर यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.




**कोल्हापूर : डॉ. बाळकृष्ण लिखित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' या महाग्रंथाचे प्रकाशन करताना डावीकडून डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अनिल काकोडकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शाहू छत्रपती, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर.**

शाहू छत्रपती, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. काकोडकर म्हणाले, डॉ. बाळकृष्ण यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा साद्यंत वेध घेतलेला आहे. हा महाग्रंथ शिवरायांच्या समकालीन परकीय वस्तुनिष्ठ संदर्भांच्या आधारे त्यांनी साकारलेला आहे. त्यामुळे त्याचे